**प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतंर्गत बांधण्यात आलेल्या पूल व मोऱ्या तपासणी संदर्भात <u>करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना.</u>**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक क्र. ग्रासयो-२०१६/प्र.क्र.३२२/योजना-९
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक -: ०९ ऑगस्ट, २०१६.

**वाचा** :- १) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.एमएसआय-३३६६/रा.म.२, दि.२१.०३.१९८८
२) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.आरएमआर-१०८९/सीआर-१०९/रस्ते-१, दि.०४.०४.१९८९
३) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.१०९८/आरएमआर/सीआर-२४८/रस्ते-१, दि.१०.१२.१९९८
४) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.आरएमआर-२००६/प्र.क्र.०८/रस्ते-१, दि.२५.०१.२००६
५) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.पीएमजीएसवाय-२०१३/ सीआर-४१०/योजना-९, दि.०१.०१.२०१४

**<u>शासन परिपत्रक</u> :-**

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ही केंद्र शासनाची योजना असून केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सुचना व निकषांनुसार राज्याच्या ग्रामीण भागात राबविण्यात येते. या योजनेतंर्गत रस्ते/ मोऱ्या/ पुलांची कामे केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निविदा प्रक्रिया अवलंबून कंत्राटदारांमार्फत करण्यात येतात. या योजनेतंर्गत काम पूर्ण झाल्यानंतर पहिल्या ५ वर्षांपर्यंत देखभाल दुरुस्ती ही संबंधित कंत्राटदारांमार्फत करण्यात येत असते. त्यापुढील ५ वर्षांची देखभाल दुरुस्ती शासनामार्फत महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था यांच्याकडून करण्यात येत असते. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या ऑपरेशन मॅन्युअल मधील प्रकरण-१४ मध्ये या योजनेतंर्गत बांधण्यात आलेल्या रस्ते, मोऱ्या व पुलांची देखभाल दुरुस्ती कशा पध्दतीने करण्यात यावी याच्या तपशीलवार सुचना दिलेल्या आहेत. याच धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजना सुरू झाली आहे. त्यामध्येही मोऱ्या व पुलांची कामे हाती घेण्यात येत असून, त्याबाबतही या सुचनांची अंमलबजावणी करण्यात यावी. त्याचप्रमाणे शासनाच्या

परिपत्रक क्र.पीएमजीएसवाय-२०१३/प्र.क्र.४१०/योजना-९, दि.०१.०१.२०१४ अन्वये देखील या संदर्भात सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत.

२. अलिकडच्या काळात प्रतिकुल पर्यावरण, वाढलेली वाहतूक व इतर नैसर्गिक घटक यामुळे, मोऱ्या व पुलाच्या बांधकामाचे निरीक्षण तांत्रिक स्तरावर विशेष लक्ष देऊन करण्याची गरज आहे. बांधकाम करताना केलेल्या संकल्पनानुसार मोऱ्या, पुल कार्यान्वित असल्याची दरवर्षी खात्री करणे आवश्यक आहे. अनपेक्षित घटकामुळे काही बांधकामांना क्षती पोहचण्याची शक्यता असते. यास्तव, नित्य नियमाने मोऱ्या व पुलांचे निरीक्षण, देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक ठरले आहे.

३. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या ऑपरेशन मॅन्युअल मधील प्रकरण-१४ शी संबंधित परिशिष्ट १४.३ मधील परिच्छेद-३ मध्ये पुल/मोऱ्यांची तपासणी पावसाळा सुरु होण्यापूर्वी, दुसऱ्यांदा पावसाळयामध्ये विशेषत: पहिल्या जोरदार अतिवृष्टीनंतर, तिसऱ्यांदा पुरानंतर व चौथ्यांदा पावसाळा संपल्यानंतर करावी, अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच पुलांचे निरीक्षण कशा स्वरुपात करावे या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने देखील अत्यंत तपशीलवार अशा सूचना संदर्भीय शासन परिपत्रक दिनांक २१.०३.१९८८, दिनांक ०४.०४.१९८९, दिनांक १०.१२.१९९८ व दिनांक २५.०१.२००६ च्या परिपत्रकाद्वारे व या विभागाच्या संदर्भ क्र.५ येथील दिनांक ०१.०१.२०१४ च्या परिपत्रकान्वयेही देण्यात आलेल्या आहेत.

४. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित पध्दतीनुसार मोऱ्या/पुलांचे निरीक्षण क्षेत्रिय स्तरावरील विविध अभियंत्यांनी पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर करावयाचे असते. या अनुषंगाने करावयाच्या निरीक्षणाची वारंवारता व तपासणी सुची आणि कोणत्या स्तरावर निरीक्षण करावयाचे याचा तपशील शासन परिपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक-एमएसआय-३३६६/रा.म.२, दिनांक २१ मार्च, १९८८ अन्वये विहीत केलेला आहे. संदर्भाधीन शासन परिपत्रकात नमूद केलेल्या आवश्यक त्या तपासणी सूची व निरीक्षण प्रपत्रे लक्षात घेऊन त्याप्रमाणे सर्व कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था यांनी त्यांच्या संबंधित जिल्हयातील पुल/मोऱ्यांचे निरीक्षण/तपासणी करावी व त्याबाबतचा तपशिल निरीक्षण नोंदवहीत व्यवस्थित ठेवावा व सदर निरीक्षण नोंदवही त्या-त्या स्तरावर ठेवाव्यात. आवश्यक तेथे छायांचित्रांसह तपशिल ठेवावा. मोऱ्या-पुल क्षतीग्रस्त, वाहतुकीस

धोकादायक आढळल्यास अपघात होणार नाहीत यासाठी आवश्यक ती खबरदारी (उदा. सुचना फलक, वाहतुक नियंत्रण इ.) घेण्यात यावी. या सुचनांची अमंलबजावणी तात्काळ करावी.

५. कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था यांनी संक्षिप्त निरीक्षण अहवाल संबंधित अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांना सादर करावा. पुल/मोऱ्यांची पाहणी व आवश्यक त्या दुरुस्त्या वेळच्यावेळी होतील याकडे अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था यांनी विशेषत्वाने लक्ष पुरवावे. पुल/मोऱ्यांच्या कामामध्ये आढळून आलेले दोष दुरुस्त करण्यासाठी आवश्यकतेनुसार अधीक्षक अभियंता, संकल्प चित्र मंडळ (पुल), सार्वजनिक बांधकाम विभाग यांची मदत घेता येईल. दरवर्षी घेण्यात येणाऱ्या देखभाल दुरूस्ती कार्यक्रमात मोऱ्या-पुलांच्या दुरूस्तीचा समावेश करण्याची दक्षता घ्यावी.

६. कार्यकारी अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार अधिक्षक अभियंता व मुख्य अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांनी मोऱ्या- पुलांच्या संदर्भात जिल्हा पाहणीच्या वेळी तपासणी नोंदवहया आवर्जून तपासाव्यात. मोऱ्या- पुलांची पाहणी तसेच दुरुस्त्या योग्यप्रकारे योग्य वेळी झालेल्या आहेत/होत आहेत याबाबत त्यांनी खात्री करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( दि.ग.मोरे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. उप सचिव, पंरा-७ , ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई,
२. मुख्य अभियंता, प्रमंग्रासयो, मग्रारविसं, पुणे,
३. सर्व अधीक्षक अभियंता, प्रमंग्रासयो, मग्रारविसं,
४. राज्य गुणवत्ता समन्वयक, प्रमंग्रासयो, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. सर्व कार्यकारी अभियंता, प्रमंग्रासयो, मग्रारविसं,
६. वित्तिय नियंत्रक, प्रमंग्रासयो, महाराष्ट्र राज्य,
७. सचिव, मुमंग्रासयो, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक,
८. कार्यासन योजना-८, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई,
९. निवड नस्ती, योजना-९, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.